**प्रेसनोट** **दि.२९/०३/२०१९**

## चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन

## कस्तुरबा वसाहती मधील बहुचर्चित रोहित जुनवणे याचा कट रचून खुन करणाऱ्या चार महिन्यापासून फरारी असलेला आरोपी ओंकार दिलीप कदम यास चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनच्या पोलीसांकडुन अटक

इसम नामे रोहित अशोक जुनवणे वय २७ वर्षे, रा.कस्तुरबा वसाहत जुनवणेनगर गणेखखिंड रोड औंध पुणे यांने इसम नामे गजेंद्र ऊर्फ दादा मोरे याच्या घराच्या बांधकामाविषयी व वेस्टएंड मॉल मध्ये माथाडीचे कामाबद्दल माहीती अधिकाराअंतर्गत माहीती मागितलेचे कारणावरून चिडून जावून आरोपी गजेंद्र ऊर्फ दादा तुळशिराम मोरे व ओंकार दिलीप कदम यांनी रोहित जुनवणे याचे खुनाचा कट रचून आरोपी प्रतिक सुनिल कदम, अमोल चोरामले, आकाश केदारी, किरण गायकवाड, किरण धेंडे, परेश मेहता, शुभम गुलाखे, गोपाळ आराडे, राकेश साळवे, प्रशांत शिंदे यांनी लोखंडी कोयत्याने रोहीत जुनवणे याच्या डोक्यावर, पाठीत, हातांवर लोखंडी कोयत्यांनी सपासप वार करुन त्यास जागीच ठार केले म्हणुन वरील अटक आरोपींकडे तपास करून त्यांचे विरूध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र पाठविण्यात आले आहे.

दाखल गुन्हा दाखल झालेपासून गुन्हयाचा मुख्य सुत्रधार आरोपी ओंकार दिलीप कदम,वय ३७ वर्षे,रा.४९/१,अक्षय सोसायटी,एरंडवणे पुणे. हा फरार होता.सदर आरोपीचा चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन कडील पोलीसांकडून शोध चालू होता. दिनांक २६/०३/२०१९ रोजी तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस नाईक प्रकाश आव्हाड व पोलीस शिपाई तेजस चोपडे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, रोहित जुनवणे याचे खुनाचे गुन्हयातील फरार आरोपी ओंकार दिलीप कदम हा श्रीनाथ प्लाझा,ज्ञानेश्वर पादुका चौक,शिवाजीनगर पुणे येथे आल्याची माहिती मिळालेने सदर महिती मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री सुनिल फुलारी,पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर, मा.पोलीस उप आयुक्त,श्री प्रकाश अक्कानवरु,परिमंडळ ०४ पुणे शहर,मा. सहा.पोलीस आयुक्त, श्री देवीदास पाटील यांना माहिती देवून त्यांनी केलेल्या सुचना प्रमाणे भास्कर जाधव,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती वैशाली गलांडे पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक संदेश केंजळे,पोलीस उप निरीक्षक श्री तुकाराम फड व कर्मचारी पो.हवा.बाळासाहेब गायकवाड,पो.हवा.मुकंद तारू, एकनाथ जोशी,पोलीस नाईक सारस साळवी,संतोष जाधव,प्रकाश आव्हाड,दादासाो काळे, पो.शि.तेजस चोपडे,ज्ञानेश्वर मुळे व अमर शेख यांची टिम तयार करून सदर इसमास सापळा रचून ताब्यात घेवून गुन्हयाचे कामी अटक करण्यात आली आहे.पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक,भास्कर जाधव हे करीत आहेत.